**महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. लेखा विभाग
क्र.लेखा/५/कावि/आयकर/२५८/२०१४
दिनांक:-२० /०३/२०१४

**विषय :- आयकराबाबत.....**
**संदर्भ :- परिपत्रक क्र. लेखा/५/आयकर/२२९४/२०१३**
**दि. १५/६/२०१३....**

**परिपत्रक,**

लेखा विभागातील संदर्भिय परिपत्रकान्वये प्रत्येक आहरण ऌ वितरण अधिकारी यांना इटीडीएस मध्ये नमुना २४Q कालमर्यादित विवरणपत्रे भरण्याची दक्षता घ्यावी व पगारातुन कपात केलेल्या आयकर धनादेश तारखेपासुन ७ दिवसांच्या आत भरणेकामी कळविणेत आले आहे.

तथापी संबधित आहरण - वितरण अधिकारी इटीडीएस सादर करताना आयकर विभागास खालील नमुद केलेप्रमाणे विविध प्रकारच्या त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

१) नमुना नं. १६ /१६ ए मध्ये आर्थिक वर्ष नमूद केले जात नाही. (उदा. आर्थिक वर्षात सन २०१३– १४ आकारणी वर्ष २०१४-२०१५ प्रमाणपत्रात नमुद केले जात नाही.)
२) कर कपात करणा-याचे चुकीचे किंवा अवैध पॅन नमुद करणे.
३) आहरण व वितरण अधिका-याचे टॅन नमुद न करणे.
४) चलनामध्ये चुकीचे कलम व निधारण वर्ष नमुद करणे.
५) इटीडीएस विवरण पत्रातील रकाने योग्य पणे न बनविणे, योग्य त्या रकान्यात कपात कमी किंवा न करण्याबद्दल संबधित आयकर अधिका-यांच्या प्रमाणपत्राचा उल्लेख न करणे.
६) नमुना २४ Q भरताना Type of Payee ची माहिती चौथ्या त्रैमासिकात न भरणे विहित मुदतीत सादर न करणे.
७) मासिक आयकर कपातीचे धनादेश ७ दिवसांत न भरणे.
८) बी.एस.आर. कोड चुकीचे नमूद करणे.

उपरोक्त त्रुटी वारंवार होत असलेने त्या टाकणेकामी सर्व आहरण-वितरण अधिकारी यांना परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, वैयक्तिक लक्ष देवून संबंधित पगारबिल लिपिक / कर्मचारी यांना सुचना देण्यात याव्यात. यासंदर्भात आयकर विभागाकडून दंडात्मक स्वरुपाची कोणतीही कारवाई झाल्यास संपूर्ण जबाबदारी आहरण-वितरण अधिकारी यांची राहिल, यांची स्पष्ट नोंद घ्यावी.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

**प्रति,**

१) सर्व संबंधित आहरण-वितरण अधिकारी / विभाग प्रमुख
------------------------- विभाग